दिशादर्शक, मार्गदर्शक!

# दिवा न्यूज

www.diwanews.com



दिवा न्यूज

आता डिजिटल स्वरूपात...

दिवा न्यूज़ची वेबसाईट सुरू..!

ताज्या घडामोडी आणि बातम्यांसाठी लॉग इन करा

www.diwanews.com

आता कुठेही असा...दिवा न्यूज़ वाचा एका क्लिक वर..

epaper.diwanews.com



▶ वर्ष-२ ■ अंक-३९ ■ epaper.diwanews.com ■ सोमवार, १ मे २०२३ ■ पाने-८ ■ किंमत ४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669


## दिव्यातील समस्यांवर 'विजय' मिळविण्यासाठी धडपडणारे सामाजिक कार्यकर्ते...

# विजय भोईर




वाढदिवस विशेष मुलाखत (पान ४-५ वर)

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज

ताज्या घडामोडी वाचण्यासाठी लॉग इन करा
www.diwanews.com

सोमवार, १ मे २०२३





सन्माननीय विजय अनंत भोईर साहेब म्हणजे व्यक्ती एक पण रूपे अनेक. समाजासाठी, जनतेसाठी स्वत:ची पद प्रतिष्ठा बाजूला ठेवून फक्त एक समाजसेवक, जनसेवक हेच पद त्यांच्यासाठी सर्वात मोठं पद आहे. लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांच्या हाकेला धावून जाणारे व्यक्ती आहेत.लोकांच्या रक्षणासाठी महाराष्ट्र पोलिसांच्या सोयीसाठी स्वखर्चाने स्वत:ची जागा एक रुपया न घेता पोलिस चौकी, पोस्ट ऑफिससाठी जागा उपलब्ध करून दिली आहे.अश्या थोर समाजसेवकाला वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा.

**– सूरज भगवान पानसरे , दिवा (प).**



२००७ च्या दरम्यान दिव्यात विजेची इतकी भयाण अवस्था होती की आम्ही सर्वत्र गेलो पण कुणीही तो प्रश्न सोडवत नव्हतं. म्हणून मी व इतर रहिवासी आम्ही एक अखेरचा आशेचा किरण म्हणून श्री.विजय भोईर साहेबांकडे गेलो तेव्हा त्यांनी निर्मला म्हात्रे , सुधाकर वारेकर यांना विनंती करून ट्रान्सफॉर्मरला जागा उपलब्ध करून देऊन स्वखर्चाने कठडा बांधून ट्रान्सफॉर्मर आणून आमचा कायमचा विजेचा प्रश्न सोडवला.अश्या आमच्या हितचिंतक श्री विजय भोईर साहेबांना वाढदिवसाच्या उदंड शुभेच्छा.

**– नरेश पाटील,**
सुभद्रा अनंत सोसायटी, दिवा पूर्व



मी विजय भोईर साहेबाना खूप जवळून ओळखतो. ते एक असं व्यक्तिमत्त्व आहे की जे कोणत्याही चांगल्या गोष्टीत एकटं न राहता सर्वांना सोबत घेऊन ते काम तडीस नेतातच. आणि पूर्ण होऊनही त्या कामाचे श्रेय स्वत:कडे न घेता त्या संपूर्ण टीमवर्कला देऊन मोकळे होतात.अगदी लहानमोठ्यांपासून प्रत्येकाला आदराने हाक मारणाऱ्या अश्या सदैव हसतमुख व्यक्तिमत्वाला माझ्याकडून वाढदिवसाच्या भरभरून शुभेच्छा.

**– अजित कदम,** प्रसिध्द निवेदक
चंद्रांगण रेसिडेन्सी, दिवा



विजय भोईर साहेबांना आजच्या वाढदिवसाच्या भरभरून शुभेच्छा. आज भोईर साहेब आमच्या ग्रामस्थांचा स्वाभिमान आहेत. कारण आज ते कोणतेही पद नसताना दिव्यासाठी इतकी कामे करत आहात की जी खरी जे आज ज्यांच्याकडे पद आहेत त्यांनी करायला हवीत. आणि भोईर साहेब आम्ही ज्या गावात जन्मतो त्या गावाचं काही तरी देणं लागतो ही भावना मनात ठेवून सतत आपल्या भूमीपुत्रांसाठी सुद्धा झटत असतात, अश्या या आमच्या समाजबांधव असणाऱ्या ,प्रत्येक दिवेकरांचा आदर्श असणाऱ्या विजय भोईर साहेबांना परमेश्वर उदंड आयुष्य देवो आणि लवकरच लोककल्याणासाठी, दिव्याच्या विकासासाठी परमेश्वर त्यांना महानगरपालिकेत पाठवो ही प्रार्थना.

**– विजय म्हात्रे,** दिवा गाव

एक आदर्श समाजसेवक कसा असावा याचं उत्तम उदाहरण म्हणजे मी गेल्या ११ वर्षांपासून दिव्यात बघतो ते म्हणजे विजय भोईर साहेब.कोण कोणत्याही पक्षाचा असो कुणीही त्यांच्याकडे जावो प्रत्येकाचं काम ते करतातच. रात्री अपरात्री, केव्हाही त्यांच्याकडे हक्काने जाऊ शकतो.त्यांच्या विषयी जेवढं बोलू तेवढं थोडंच. अश्या सरळ स्वच्छ मनाच्या भोईर साहेबांना वाढदिवसाच्या अनंत शुभेच्छा.

**– फिलिप फर्नांडिस,** दिवा पूर्व

**संपादक**
सुहास खंडागळे
**व्यवस्थापक**
सौ. अरुणा किरण जाधव
मो. ९९८७५१२००१
**छायाचित्रकार/प्रतिनिधी**
सुदेश सकपाळ
**वितरण प्रतिनिधी**
संतोष मदने
**ऑफीस पत्ता :-**
गाळा नं. ०६, आई जीवदानी कॉम्प्लेक्स, हरिश्चंद्र अपार्टमेंटच्या मागे,वारेकर शाळेजवळ, गुरुदर्शन नगर, मुंब्रादेवी कॉलनी रोड, दिवा (पूर्व), ठाणे-४००६१२.



साधारण ५ लाख लोकसंख्येच्या दिव्यात महिलांसाठी एक साधं स्वच्छतागृह नसावं ही शरमेची बाब होती. म्हणून मी आदरणीय श्री.विजय अनंत भोईर साहेबांकडे याबाबत चर्चा केली तर त्यांनी त्वरित प्रतिसाद देऊन पाठपुरावा केला. आज दिव्यात किमान १/२ सार्वजनिक स्वच्छतागृहे दिसत आहेत.

**– शीतल लाड,**
बी आर नगर,
दिवा पूर्व



मै विजय भोईर साब को पिछले ७/८ साल से जानता हू। साहब के आता तरी जागा हो दिवेकर इस संस्था का मुझे बहुत अभिमान है। इस संस्था के माध्यम से वे निरंतर दिवा के लोगो से हर सुखदु:ख मे निरंतर जडते रहे। उनके कारण हमे जो गलत हो रहा है उसके खिलाफ आवाज उठाने की हक की जगह हमे जागा हो दिवेकर के माध्यम से मिली। ऐसें हमारे प्रिय व्यक्तिमत्त्व को ईश्वर शतायुषी करे, यही आज उनको जन्मदिन की हमारे तरफ से शुभकामना।

**– रविशंकर गुप्ता,**
दिवा पूर्व



माननीय विजय दादा भोईर सर के हमारे पूर्ण परिवार पे काफी एहसान है। जब मेरे लडकी का ७वी कक्षा मे दिवा मे कही स्कुल मे ऍडमिशन नही हो रहा था , उस वक्त दादाने खुद ध्यान देके मेरे बच्ची का ऍडमिशन ऑक्सफर्ड स्कुल मे करवाया वो भी कम फी मे। ऐसें गरीबो के मसीहा को जन्मदिन की बहुत बहुत शुभकामना।

**– रंभा राजभर**
सिद्धीविनायक गेट,
दिवा पूर्व

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
**संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669**

Printed, Published and Owned by Suhas Shantaram Khandagale and Printed at Siddhhakala Print Media & Publication Pvt. Ltd. Plot No. W--230, TTC Industrial Area, Khairane, Navi Mumbai-400710. Dist. Thane, Maharashtra and Published at Shri Krupa Building, A-Wing, First Flr., Flat No. 101, Near Sent Marry School, Diva (E), Thane-400612 Taluka/Dist. Thane, State-Maharashtra. **Editor : Suhas Shantaram Khandagale, RNI No.-MAHMAR/2021/80669**

## रेल्वे सुविधा



# विजय भोईर यांच्या नेतृत्वाखाली कोकण रेल्वे प्रवासी संघटनेच्या २०१६ पासूनच्या संघर्षाला यश...

## संघर्ष कोकण रेल्वे प्रवासी संघटनेच्या २०१६ पासून केलेल्या बऱ्याच मागण्याना अखेर रेल्वे प्रशासनाकडून हिरवा कंदील



**संघर्ष कोकण रेल्वे प्रवासी संघटनेने दिवा रेल्वे स्टेशनावर होणाऱ्या बऱ्याच गैरसोयी दूर होण्यासाठी विविध मागण्या २०१६ पासून रेल्वे मंत्रालयाकडे केल्या होत्या. सातत्याने त्याचा पाठपुरावा केल्याने त्यातील पुढील मागण्या रेल्वेने मान्य करून कार्यान्वित केल्या आहेत!**





- दिवा रेल्वे स्टेशनवरील फलाट क्र.१/२,३/४,५/६,७/८ वर पिण्याच्या पिण्यासाठी पाणपोई बांधण्यात आल्या.
- फलाट क्र १ व २ वर एक्सेलटर बसवण्यात आले.
- दिवा पूर्व येथे नवीन तिकीट घर बांधण्यात आले.
- लोकल लेट झाल्यावर अरुंद षेल वर होणारी प्रवाश्यांची गैरसोय टाळण्यासाठी षेलची रुंदी वाढवण्यात आली.
- अलीकडे फलाट क्र ५/६ वर शौचालयाचे बांधकाम सुरू करण्यात आलं आहे.

*कोकणात जाणाऱ्या लांब पल्ल्याच्या गाड्यांना थांबा देणे काही गाड्या फलाटांची लांबी कमी असल्याने थांबत नाहीत,तर त्यांची लांबी वाढवणे, अजूनही दिवा येथे बाहेरगावी जाणाऱ्या नागरिकांना दिवा स्टेशन येथे आरक्षण केंद्र उपलब्ध नाही. त्याचीही मागणी संघटनेने केली आहे. त्याचबरोबर लवकरात लवकर तांत्रिक त्रुटी दूर करून गर्दीच्या वेळी दिव्यातून सकाळी CST लोकल सोडण्यात याव्यात यावरही संघटनेने रेल्वे प्रशासनाचे लक्ष वेधले आहे.*



*रेल्वे सुविधांच्या लढयात सहकार्य करणाऱ्या सर्व रेल्वे प्रवाश्यांचे, समस्त दिवेकर आणि मुख्यत्वाने रेल्वे राज्यमंत्री आदरणीय श्री. रावसाहेब दानवेजी, दिवा भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते या सर्वांचे संघर्ष कोकण रेल्वे प्रवासी संघटनेकडून खूप खूप आभार व धन्यवाद.*

*– संघर्ष कोकण रेल्वे प्रवासी संघटना*

# दिवा रेल्वे स्थानकातील प्लॅटफॉर्म क्रमांक १ व २ वरील सरकते जिन्याची पुजा करुन उद्घाटन करताना...





## स्टेशन परिसरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी सातत्याने पाठपुरावा!





संघर्ष कोकण रेल्वे प्रवासी संघटना दिवा व शिव शक्ती शिक्षा युनियन दिवा यांच्या वतीने दिवा पूर्वे कडील रेल्वे फाटक व आसपास च्या परिसरात होणारी वाहतूक कोंडी व गर्दी, ट्रॉफीक जॅम या त्रुटी दूर करण्यासाठी रेल्वे अधिका-यांशी प्रत्यक्ष जागेवर जाऊन चर्चा करण्यात आली त्यावेळेस चे छायाचित्रे.

'संघर्ष कोकण रेल्वे प्रवासी संघटना 'दिवा. अध्यक्ष विजय भोईर व शिव शक्ती रिक्षा युनियन दिवा अध्यक्ष विनोद भगत, उपाध्यक्ष: भाजपा युवा मोर्चा ठाणे शहर सतिश केळशीकर आदी त्यावेळी उपस्थित होते.










# क्लस्टर योजनेचा सर्वे होताना सर्वेची पोचपावती मिळावी, विजय भोईर यांच्या कार्यक्रमात तज्ज्ञांचे मत




दिवेकरांसाठी क्लस्टर योजना संजीवनी ठरेल का? या विषयावर आता तरी जागा हो दिवेकर व दिवा भाजपच्या संयुक्त विद्यमाने केलेल्या मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले.

या शिबिरात हजारो नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.हे चर्चासत्र यशस्वी होण्यासाठी श्री समर्थ मित्र मंडळ, सेव दिवा फौंडेशन, शिवशक्ती रिक्षा युनियन, आदर्श कोकण सहकारी संस्था, तन्वी फौंडेशन, नवरूप मित्र मंडळ, नागनाथ केबल नेटवर्क, आदर्श मित्र मंडळ, नरेश्मा फौंडेशन, अंकुश मित्र मंडळ इ.सामाजिक संस्थानीदेखील सहकार्य केले.तसेच सर्व भाजपचे पदाधिकारी सर्वश्री अशोक पाटील, सचिन भोईर,विनोद भगत, रोशन भगत, मधुकर भगत,नरेश पवार,समीर चव्हाण, युवराज यादव, दिलीप भोईर,मधुकर पाटील, प्रवीण पाटील तसेच ज्येष्ठ समाजसेवक गोवर्धन भगत,सपना भगत, ज्योती पाटील,संगिता भोईर, दिलीप भोईर, इ.उपस्थित होते.



आता तरी जागा हो दिवेकरचे संस्थापक विजय भोईर यांनी हे चर्चासत्र आयोजित करण्याचा उद्देश लोकांना समजावून सांगताना ही योजना कशी महत्वाची आहे व आपला या शिबिराचा नेमका उद्देश काय हे लोकांना पटवून दिले.तसेच दिवा भाजप मंडळ अध्यक्ष श्री रोहिदास मुंडे यांनी शिबिराची प्रस्तावना केली.

या योजनेबद्दल सर्वे करायला आलेल्या मंडळींना सहकार्य करा,परंतु त्याचबरोबर सर्वे केल्याची पोचपावती मागण्याचा आग्रह धरा असा संदेश या शिबिरातून देण्यात आला.

# क्लस्टर योजना जनहिताची व्हावी ही विजय भोईर यांची भूमिका!

- दिव्यात जी क्लस्टर योजना होणार त्यात लोकांची फसवणूक नको ही मुख्य भूमिका घेऊन विजय भोईर यांनी जनजागृती उपक्रम सुरू केले.
- व्यावसायिक गाळेधारकांना पण त्यांच्या जागे इतकीच जागा मिळाली पाहिजे! जी लोक राहत आहेत त्यांना तितकेच क्षेत्रफळ द्यावे ही भूमिका विजय भोईर यांनी घेतली.
- योजना राबवायची असेल तर स्थानिक रहिवाशी आणि स्थानिक बिल्डर यांनी ती राबवावी ही भूमिका भोईर यांनी घेतली आहे.
- भूमिपुत्रांना जागेचा मोबदला दिला जावा. जागामालकांना ४०% मोबदला मिळावा. जोपर्यंत योजना प्रत्यक्ष राबवण्यास सुरुवात होत नाही तोपर्यंत क्लस्टरच्या नावाने राजकारण करू नये अशी स्पष्ट भूमिका विजय भोईर यांनी क्लस्टर बाबत घेतली आहे.

